• वर्ष : ०३ • अंक : २५४ • पुणे • शुक्रवार, दि. ०५ जून २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**डिजिटल प्रतींचे** दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**












## थोडक्यात पण महत्वाचे

### मजेदार ड्रिंक ब्रँड मोगू मोगूची भारतात जागतिक मोहिम सुरू




पुणे (आरंभ पर्व) : आजची Gen Z पिढी इंटरनेटवर काहीही म्यूट, ब्लॉक किंवा स्किप करू शकते. पण खऱ्या आयुष्यात अशी कोणतीही सुविधा नसते. डिजिटल जगातील सहज अनुभव आणि दैनंदिन आयुष्यातील अवघड, टाळता न येणारे प्रसंग यातील हाच फरक लक्षात घेऊन मोगू मोगूने आपली नवीन जागतिक मोहीम "वाना स्किप? यू गॉटा च्यू" तयार केली आहे. ही मोहीम 1 जून रोजी सायंकाळी 6 वाजता भारतात सुरू होत आहे. या मोहिमेद्वारे Gen Z ला काल्पनिक 'स्किप बटण' विसरून मोगू मोगूच्या खास 'सिप अँड च्यू' अनुभवाचा आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही मोहीम थायलंड स्थित सॅप्पे पब्लिक कंपनी लिमिटेड (सॅप्पे) या कंपनीने तयार केली आहे. SAPPE ही मोगू मोगूची मूळ कंपनी असून 'स्नॅक ड्रिंक' या श्रेणीची निर्माती आहे. जगभरातील Gen Z तरुणांच्या अनुभवांवर केलेल्या संशोधनातून तीन सर्वात सामान्य आणि अवघड प्रसंग समोर आले. त्यामध्ये "द स्ट्रेंजर आइज़" (सार्वजनिक वाहतुकीत एखाद्या अनोळखी व्यक्तीसोबत नकळत होणारा नजरेचा संपर्क), "द थर्ड व्हील" (जोडप्यांसोबतच्या सहलीत एकटाच सिंगल व्यक्ती असणे) आणि "द फर्स्ट टिंडर डेट" (प्रोफाइलमध्ये दिसणारी व्यक्ती आणि प्रत्यक्षात भेटणारी व्यक्ती पूर्णपणे वेगळी असणे) यांचा समावेश आहे. याच प्रसंगांवर या मोहिमेची संकल्पना आधारित आहे. प्रत्येक परिस्थितीत मोगू मोगू हा एक मजेशीर उपाय म्हणून दाखवण्यात आला आहे मोहिमेचा संदेश सोपा आहे -"जर एखादा प्रसंग स्किप करता येत नसेल, तर तो मोगू मोगूचा (चघळत-चघळतच) च्यूई अनुभव घेत सहज पार करा."

### जुन्नरला भर दिवसा कोयता घेऊन फिरणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर शहरात भर दिवसा कोयता, लोखंडी रॉड,अँगल,चैन घेऊन धुमाकूळ घालणाऱ्या सहा जणांच्या टोळक्याचे विरुद्ध जुन्नर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून यातील एक आरोपीस ताब्यात घेतले आहे. याबाबत पोलीस कर्मचारी कैलास माधव केंद्रे यांनी फिर्याद दिली आहे. एक विधी संघर्ष बालक असून अन्य आरोपीची नावे पुढील प्रमाणेअरबाज हमीद हलवाई, इरफान मजीद हलवाई, शायरा माजीद हलवाई, मुस्कान अरबाज हलवाई, मोहसीन इकबाल अत्तार सर्व रा. सदाबाजारपेठ जुन्नर ता.जुन्नर जि.पुणे याप्रकरणी इरफान माजिद हलवाई यास पोलिसांनी अटक केली आहे.अशी माहिती पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी दिली. बुधवार ता.०२ रोजी सदाबाजार पेठ येथे इरफान हलवाई यांचे बांगड्याच्या दुकानासमोर ही घटना घडली. यातील एक विधी संघर्षीत बालक व अरबाज मजीद हलवाई भरदिवसा रस्त्यावर हातामध्ये कोयता घेवुन अंगावर धावुन जात होते. तसेच इरफान मजीद हलवाई हा लोखंडी रॉड असलेला चैनव्हील हातात घेवुन सार्वजनिक ठिकाणी हत्यारांच्या माध्यमातुन दहशत माजवत होता. व शायरा मजीद हलवाई, मुस्कान अरबाज हलवाई व मोहसीन इकबाल अत्तार याने लोखंडी अँगल घेवुन सार्वजनिक ठिकाणी गैर कायद्याची मंडळी जमवुन मोठमोठ्याने आरडाओरड, शिवीगाळ केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम -189(2),189(4),191(2),190,352,351(2),4,25 प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### जाधवर शाळेसमोरील रस्त्यावर दुचाकींसाठी स्वतंत्र मार्गाची मागणी

- लोखंडी खांब बसवून दुचाकी साठी सुरक्षित रस्ता करावा; रस्ता संघर्ष समितीची मागणी

पुणे (आरंभ पर्व) : नऱ्हे येथील जाधवर शाळेसमोरील रस्त्यावर वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून, दुचाकी वाहनांसाठी स्वतंत्र व सुरक्षित मार्ग पुन्हा सुरू करण्यात यावा, अशी मागणी "आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती"नऱ्हे यांनी पुणे महापालिकेच्या सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, जाधवर शाळेसमोरील रस्त्यावर यापूर्वी नवले ब्रिज ते नवले हॉस्पिटल तसेच जाधवर चौक परिसरात दुचाकी वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध करून देण्यात आला होता. त्या ठिकाणी सिमेंटचे खांब बसविल्यामुळे वाहतुकीचे योग्य नियमन होत होते आणि ट्रॅफिक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाली होती. मात्र, काही समाजकंटकांनी हे सिमेंटचे खांब तोडल्याने दुचाकी व इतर वाहनांची अनियमित आणि उलट-सुलट वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे परिसरात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून स्थानिक नागरिक, विद्यार्थी, रुग्ण तसेच सर्वसामान्य वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर जाधवर शाळेसमोरील रस्त्यावर कायमस्वरूपी आणि मजबूत लोखंडी खांब बसवून दुचाकी वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग पुन्हा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक कार्यवाही करावी, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही संघर्ष समितीने दिला आहे. हे निवेदन संघर्ष समितीचे सदस्य रोहिदास जोरी, भानुदास साठे, अनंत कंबरकर, नितीन घोलप, सूर्यकांत चव्हाण, प्रशांत सुरेश पाटील, अमोल फासे, संदीप जायभाय, मयूर धनवट, संदीप साळुंखे, नितीन खटावकर, योगेश सानप, सुग्रीव गोबाडे, प्रवीण पाटील, प्रवीण वाळी तसेच समितीचे सर्व सभासद आणि त्रस्त नागरिक यांच्या स्वाक्षरीसह सादर करण्यात आले आहे.

# संदीप मते यांच्यावर सोपवली मोठी जबाबदारी

## राष्ट्रवादी काँग्रेसचा मोठा निर्णय : राष्ट्रवादी खडकवासला विधानसभा अध्यक्षपदी संदीप मते पाटील यांची निवड

- महापालिकेतील संधी थोडक्यात हुकली; पक्ष नेतृत्वाचा पुन्हा मतेंवर विश्वास





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पुणे शहरातील संघटनात्मक बांधणीला गती देण्यासाठी महत्त्वाचे बदल करण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर खडकवासला विधानसभा अध्यक्षपदी संदीप मते पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्या निवडीचे पत्र आज पुणे येथील पक्ष कार्यालयात खासुप्रियाताई सुळे ,पुणे शहराचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

ह्यावेळी जिल्हाध्यक्ष विजयजी कोलते, पुणे महानगरपालिका गटनेते, काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता ताई इंगळे, त्रिंबक अण्णा मोकाशी, किशोर कांबळे, अजिंक्य पालकर, शरद दबडे तसेच पक्षाचे अनेक निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संदीप मते पाटील यांचा राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनुभव लक्षात घेऊन पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे, पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३३ मधून त्यांनी पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. अवघ्या काही अल्पशा मतांनी त्यांना पराभवाचा सामना करावा लागला मात्र खचून न जाता पुन्हा जनतेत जाऊन ते कामाला लागलेला पाहायला मिळाले अवघ्या काही मतांच्या फरकाने पराभव स्वीकारावा लागला, मात्र त्या पराभवाने न खचता त्यांनी पुन्हा जनतेत जाऊन नव्या जोमाने कामाला सुरुवात केली. जनतेशी असलेली नाळ कायम जपत त्यांनी विकास आणि लोकसेवेचा वसा अखंडपणे पुढे सुरू ठेवला. खडकवासला विधानसभा अध्यक्षपदी नियुक्तीनंतर बोलताना संदीप मते पाटील यांनी पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पक्षाने दिलेली जबाबदारी ही माझ्यासाठी मोठी संधी असून या जबाबदारीचे सोने करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

> "पक्ष संघटनेचे बळ हेच आमचे खरे सामर्थ्य आहे. कार्यकर्त्यांना सोबत घेऊन खडकवासला विधानसभा मतदारसंघात पक्षवाढीसाठी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी अधिक जोमाने काम केले जाईल, आदरणीय पवार साहेबांच्या दूरदृष्टीने खासदार सुप्रिया सुळे व इतर वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली खडकवासला मतदारसंघातील जनतेसाठी आम्ही काम करणार आहोत. माझ्या निवडीबद्दल सर्व वरिष्ठ नेते मंडळीचे मी आभार मानतो"
>
> **- संदीपदादा मते, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) खडकवासला विधानसभा**

खडकवासला विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटना अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. आगामी २०२९ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील प्रत्येक भागात कार्यकर्त्यांचे संघटन वाढवून पक्षाची ताकद तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## सोनालिकाची सर्वाधिक एकंदर १७,२०४ ट्रॅक्टर केली विक्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने मे महिन्यातील आतापर्यंतची सर्वाधिक १७,२०४ ट्रॅक्टरची विक्री नोंदवत आर्थिक वर्ष २०२७ मध्ये आपल्या गतीला वेग दिला आहे. तसेच एकूण २१ टक्के वाढ नोंदवून उद्योगाच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे. सोनालिकाचा हा नवा मैलाचा दगड शेतकऱ्यांपर्यंत 'जीतने का दम' पोहोचवण्यावर ब्रँडने सातत्याने दिलेला भर आणि भारताला कृषी महासत्ता बनवण्याच्या उद्देशाने शेतीच्या दृष्टीने कार्यक्षम आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यात त्याची भूमिका अधोरेखित करणारा आहे. याशिवाय कंपनीने भारतातील आगामी खरीप हंगामाच्या तयारीचा एक भाग म्हणून आजपर्यंतच्या सर्वाधिक मासिक १७,०२९ ट्रॅक्टर उत्पादनाची नोंद केली आहे. मान्सून हा अनेक दशकांपासून भारतीय शेतीमध्ये आशावादाला चालना देणारा एक महत्त्वाचा घटक आहे. मात्र, शेतकरी आता सुधारित पीक व्यवस्थापन आणि चांगल्या उत्पादनासाठी सिंचनाच्या वाढत्या तीव्रतेवर अवलंबून राहत असून तांत्रिकदृष्ट्या प्रगत ट्रॅक्टर शोधत आहेत. भविष्यासाठी सज्ज असलेल्या उत्पादनांच्या माध्यमातून 'जीतने का दम'वर असलेल्या बळकट विश्वासाच्या आधारे सोनालिका ट्रॅक्टर्स तज्ज्ञ अभियांत्रिकीसह डिझाइन केलेले शक्तिशाली ट्रॅक्टर आणि जगातील नंबर १ ट्रॅक्टर प्लांटमध्ये विकसित करण्यात आलेल्या सर्वात मोठ्या इंजिनांसह शेतकऱ्यांना सेवा देण्यासाठी सज्ज आहे. ग्रामीण बाजारपेठांमध्ये कंपनीची वाढणारी उपस्थिती आणि अविरतपणे ग्राहकांच्या समाधानावर लक्ष केंद्रित केल्याने देशाच्या कृषी वाढीच्या प्रवासात विश्वासू भागीदार म्हणून तिचे स्थान आणखी मजबूत झाले आहे.

## कै. लक्ष्मीबाई सहादू भडावळे सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा समारोप

### विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिकांचे वितरण



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कै. लक्ष्मीबाई सहादू भडावळे सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा समारोप व प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

शिबिरामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले तसेच विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या उन्हाळी प्रशिक्षण शिबिरामध्ये डान्स समर कॅम्प, १० मीटर एअर पिस्तूल व रायफल शूटिंग प्रशिक्षण, फॅन्सी ड्रेस स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपले कलागुण सादर केले.

कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच 'बेस्ट डान्सर' पुरस्कार जाहीर करून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. डान्स व शूटिंग प्रशिक्षणासाठी नव्या प्रवेशाबाबत माहिती देण्यात आली. आगामी सहलीबाबत (पिकनिक) विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास नगरसेवक तथा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय अध्यक्ष सचिन मोरे तसेच नगरसेविका जयश्री भूमकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, कालिदास चावट, प्रसिद्ध संमोहनतज्ज्ञ डॉ. प्रविणकुमार शेंडे, अक्षय चरवड तसेच अनंता भडावळे यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमात बोलताना सचिन मोरे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि कलागुणांचे कौतुक केले. अशा प्रशिक्षण शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळत असल्याचे सांगत त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे संयोजन माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे यांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी गंगाधर भडावळे यांनी उपस्थित मान्यवर, पालक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या कौशल्यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम ठरल्याची भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली.

## नालासफाई कामांची महानगरपालिका प्रशासनाकडून पाहणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सिंहगड रस्ता परिसरातील नाला सफाई व पूरप्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मा. महापौर सौ. मंजुषा दीपक नागपुरे आणि मा. महापालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. रामनगर परिसरातील ब्रम्हा हॉटेल चौक येथे ही पाहणी करण्यात आली. यावेळी माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप, प्रभाग क्रमांक ३५ चे नगरसेवक सचिन मोरे , ज्योती गोसावी उपस्थित होते. पाहणीदरम्यान स्टॉर्म वॉटर ड्रेनेज व्यवस्थेची स्थिती, पावसाच्या पाण्याचा निचरा, नाल्यांमधील अडथळे तसेच पूरजन्य परिस्थिती टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. परिसरातील नाल्यांमधील गाळ व अडथळे तातडीने दूर करून पाण्याचा प्रवाह सुरळीत राहील यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला. यावेळी मा. आयुक्त नवल किशोर राम यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना पावसाळ्यापूर्व सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांना पावसाळ्यात कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागू नये आणि पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी महानगरपालिका प्रशासन सज्ज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सिंहगड रस्ता परिसरातील वाढती वस्ती आणि पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करून प्रशासनाने वेळेपूर्वीच उपाययोजनांना गती देण्याची मागणी यावेळी माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केली.

## Ai+ Smartphone ने ₹३५० कोटींहून अधिक महसूल साध्य केला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




Ai+ Smartphone ने आज एक महत्त्वपूर्ण विकासाचा टप्पा जाहीर केला, ज्यामध्ये केवळ मे २०२६ या महिन्यात ३ लाखांहून अधिक युनिट्स स्मार्टफोन विक्री आणि ₹३५० कोटींहून अधिक महसूल प्राप्त झाला. ही कामगिरी भारतातून एक नव्या पिढीचा तंत्रज्ञान ब्रँड उभारण्याच्या Ai+-च्या दृष्टिकोनाला मिळत असलेल्या वाढत्या गतीचे प्रतिबिंब आहे — नवोन्मेष, सुलभता आणि ग्राहक-प्रथम विचारसरणी एकत्र करून नव्या पिढीच्या वापरकर्त्यांसाठी स्मार्टफोन अनुभवाची पुनर्कल्पना केली जात आहे. भारतीय स्मार्टफोन बाजारात प्रवेश केल्यापासून एक वर्षापेक्षा कमी काळात, Ai+ Smartphone देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्मार्टफोन ब्रँड्सपैकी एक म्हणून उदयास आले आहे, जे एका साध्या परंतु शक्तिशाली विश्वासाने प्रेरित आहे: तंत्रज्ञान केवळ काही मोजक्या लोकांचा विशेषाधिकार असू नये, ते सर्वांसाठी सुलभ असले पाहिजे. हा टप्पा Ai+ Smartphone Nova2, Nova2 Ultra & NovaFlip-च्या एप्रिल २०२६ मधील यशस्वी प्रक्षेपणानंतर आला आहे.

## अवादा ग्रुपची पुण्यात जनजागृती मोहीम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



अक्षय ऊर्जेबाबत देशभरात जनजागृती वाढवण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या उपक्रमांतर्गत, भारतातील अग्रगण्य एकात्मिक ऊर्जा संक्रमण समूहांपैकी एक असलेल्या अवादा ग्रुपने 'अवादा भारत उदय यात्रा' हा आपला प्रमुख उपक्रम पुण्यात राबविला. अवादा ग्रुपने या माध्यमातून नागरिक, स्थानिक समुदाय आणि विविध घटकांशी शाश्वत ऊर्जा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत संवाद साधला. ८ मे २०२६ रोजी नोएडामधून या यात्रेला सुरुवात करण्यात आली. अक्षय ऊर्जा स्वीकार आणि शाश्वत जीवनशैली याबाबत तळागाळात जागरूकता निर्माण करणे, तसेच भारताच्या स्वच्छ आणि अधिक आत्मनिर्भर ऊर्जा भविष्याच्या दिशेने होणाऱ्या संक्रमणाला बळ देणे, हा या देशव्यापी जनजागृती मोहिमेचा उद्देश आहे. विशेष डिझाइन केलेल्या या व्हॅनने आतापर्यंत उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या चार राज्यांसह नऊ शहरांमधून सुमारे १७१४ किमीचा प्रवास पूर्ण केला आहे. प्रत्यक्ष उपक्रम आणि जनसहभाग मोहिमांच्या माध्यमातून ही यात्रा थेट स्थानिक समुदायांशी संवाद साधत आहे. पुण्यातील मुक्कामादरम्यान या यात्रेमध्ये विविध आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अक्षय ऊर्जेच्या संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यासाठी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले. तसेच, अक्षय ऊर्जेबाबत असलेल्या सर्वसामान्य गैरसमजांवर आधारित संवादात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांना शाश्वत जीवनशैलीसाठी वैयक्तिक बांधिलकी व्यक्त करता यावी, यासाठी 'डिजिटल ग्रीन प्लेज' (डिजिटल हरित प्रतिज्ञा) घेण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली.

## ७१ वर्षीय माऊलीला मिळाले जीवनदान

### डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या न्यूरोसर्जरी टीमची कौतुकास्पद कामगिरी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आई" हा प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार असतो. याच माऊलीच्या डोक्यावर आलेले गंभीर संकट पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील सुपर स्पेशालिटी रुग्णालय आणि संशोधन केंद्रातील न्यूरोसर्जरी विभागाच्या डॉक्टरांनी आपल्या अथांग कौशल्याने परतावून लावले आहे. न्यूरोसर्जरी विभागाचे प्रमुख (HOD) प्रोफेसर डॉ. आशिष चुघ यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७१ वर्षीय ज्येष्ठ माऊलीवर अत्यंत गुंतागुंतीची आणि यशस्वी मेंदूची शस्त्रक्रिया करून त्यांना नवे आयुष्य दिले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ७१ वर्षीय रुग्ण श्रीमती गयाबाई गोरख उदमले यांना मेंदूच्या गंभीर आजारामुळे अत्यंत आणीबाणीच्या आणि चिंताजनक अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णाचे वय ७१ वर्षे पूर्ण असल्याने आणि मेंदूची शस्त्रक्रिया अत्यंत क्लिष्ट व संवेदनशील असल्याने वैद्यकीय पथकासमोर प्रत्येक सेकंद महत्त्वाचा होता. मात्र, न्यूरोसर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. आशिष चुघ यांनी तातडीने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत आपल्या विभागातील वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमला सक्रिय केले आणि या कठीण शस्त्रक्रियेचे आव्हान यशस्वीपणे पेलले. या अत्यंत नाजूक शस्त्रक्रियेमध्ये न्यूरोसर्जरी विभागातील प्रोफेसर डॉ. सारंग शिरीष गोटेचा, प्रोफेसर डॉ. प्रशांत पुनिया आणि एसोसिएट प्रोफेसर डॉ. इशांत शेखर रेगे या वरिष्ठ डॉक्टरांच्या पथकाने आपले संपूर्ण वैद्यकीय कौशल्य पणाला लावले.७१ व्या वर्षी अशा प्रकारच्या क्लिष्ट शस्त्रक्रियेनंतर माऊलींच्या प्रकृतीत झालेली सुधारणा ही या संपूर्ण टीमच्या सामूहिक कष्टांचे आणि अनुभवाचे गोड फळ आहे. श्रीमती गयाबाई उदमले यांच्यावरील ही संपूर्ण गुंतागुंतीची शस्त्रक्रिया आणि उपचार केंद्र सरकारच्या 'आयुष्मान भारत / महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने' अंतर्गत पूर्ण करण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून गरिबांमधील गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांनाही डॉ. डी.वाय. पाटील रुग्णालयासारख्या अत्याधुनिक सुविधायुक्त ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचार मिळणे शक्य होत आहे, हाच या योजनेचा मुख्य उद्देश या उपचारादरम्यान दिसून आला. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतरचा काळ रुग्णासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. डॉ. आशिष चुघ, डॉ. सारंग गोटेचा, डॉ. प्रशांत पुनिया आणि डॉ. इशांत रेगे यांच्या मार्गदर्शनाखालील न्यूरोसर्जरी टीम मध्ये डॉक्टर अझर झोजवाला , डॉक्टर मलिक अर्जुन यासह सपूर्ण निरो सर्जरी डॉक्टर टीम आयसीयू (ICU) व वॉर्डमधील ड्युटी डॉक्टर्स, फिजियोथेरपिस्ट आणि नर्सिंग स्टाफच्या पथकाने अहोरात्र मेहनत घेऊन रुग्णावर बारीक लक्ष ठेवले. नुकतेच रुग्णाचे टाके सुरक्षितपणे काढण्यात आले असून, त्यांची प्रकृती आता वेगाने सुधारत आहे.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. ०५ जून २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे

### सेवानिवृत्त मुख्याध्यापक औटी यांचे निधन



जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर नगर पालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सावळेराम महादू औटी वय ७६ यांचे आज बुधवार ता.०४ रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले.जुन्नर नगर परिषदेने त्यांचा आदर्श शिक्षक म्हणून गौरव केला होता. येथील जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे सभापती म्हणून त्यांनी काम पाहिले.शिक्षक संघटनेत महत्वाची पदे सांभाळली. कुकडी नदी तीरावर भास्कर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या मागे एक मुलगा,मुलगी,पुतणे,नातवंडे असा परिवार आहे. राहुल औटी त्यांचे पुत्र होत.

### परा म्युझिक भारतात पहिली एआय म्युझिक कंपनी म्हणून लाँच




मुंबई (आरंभ पर्व) : परा म्युझिकने आज भारतातील पहिली एआय-आधारित म्युझिक कंपनी म्हणून अधिकृतपणे आपल्या कार्याची सुरुवात जाहीर केली आहे. कंपनीचा उद्देश भारतीय संगीताला भारतात आणि जगभरात अधिक लोकांपर्यंत पोहोचवणे आहे. अपोलो ग्रोथ कॅपिटलच्या नेतृत्वाखालील अँजेल आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या समूहाने या कंपनीत गुंतवणूक केली आहे. येथे गाणी कलाकार स्वतः तयार करतात, तर एआय फक्त बाजार समजून घेण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी वापरले जाते. हे एआय टूल संगीताचा कॅटलॉग तयार करणे, त्याचे वितरण करणे आणि उत्पन्नाशी संबंधित निर्णय घेण्यास मदत करते. परा म्युझिक पुढील चार वर्षांत हिंदी आणि विविध प्रादेशिक भाषांमध्ये चित्रपट आणि नॉन-फिल्म संगीत मिळून सुमारे 40,000 गाण्यांचा मोठा कॅटलॉग तयार करण्याची योजना आखत आहे. भारत आधीच जगातील सर्वात मोठ्या संगीत बाजारांपैकी एक आहे आणि FICCI-EY मीडिया आणि एंटरटेनमेंट रिपोर्ट 2026 नुसार, 2028 पर्यंत हा बाजार सुमारे 7,500 कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे आणि दरवर्षी सुमारे 9% वाढ होण्याची शक्यता आहे. तरीही, लोकांना हवे असलेले संगीत आणि ते सहज मिळणे यामध्ये अजूनही मोठी तफावत आहे, विशेषतः प्रादेशिक आणि नॉन-फिल्म संगीताच्या बाबतीत ही समस्या अधिक दिसते. उद्योगातील अंदाजानुसार स्ट्रीमिंग आणि रेकॉर्डेड म्युझिक दोन्ही क्षेत्रांत वाढ होत आहे. हिंदी तसेच प्रादेशिक भाषांतील संगीत ऐकण्याचे प्रमाणही वाढत आहे. ही संधी ओळखून परा म्युझिक दुर्लक्षित मागणीसाठी मजबूत संगीत कॅटलॉग तयार करणे, त्याचे वितरण करणे आणि कमाईची चांगली व्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न करत आहे.

### ३.२६ लाख एकर क्षेत्र झाले पराली जाळण्या पासून मुक्त

मुंबई (आरंभ पर्व) : जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एचडीएफसी बँकेने त्यांच्या परिवर्तन उपक्रमाचा एक भाग म्हणून सीआयआय फाऊन्डेशनच्या सहकार्याने क्रॉप रेसिड्यू मॅनेजमेंट (सीआरएम) उपक्रमा अंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून या अंतर्गत २०२५ च्या मौसमात पंजाब आणि हरियाणातील ८८ टक्के म्हणजेच ३,७८,४२५ एकर क्षेत्राला पराली जाळण्यापासून वाचवण्यात यश मिळाले आहे. लुधियाना आणि संगरुर जिल्ह्यात असलेल्या ३८० गावांमधील ८६,००० शेतकऱ्यां पर्यंत पोहोचून या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक आणि निष्कर्श दिसून येणाऱ्या प्रयत्नांच्या माध्यमातून उत्तर भारतातील कृषी क्षेत्रामुळे होणाऱ्या हवेच्या प्रदुषणावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. भात कापणीनंतर उरलेल्या परालीचे जाळणे हे दर हिवाळ्यात उत्तर भारतावर पसरून राहणाऱ्या गंभीर वायूप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांपैकी एक आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत होते आणि दीर्घकालीन हृदय व फुफ्फुसांच्या आजारांमध्ये वाढ होते. सुमारे १/३ एकर शेतातून निर्माण होणाऱ्या एका टन भाताच्या परालीचे जाळल्याने वातावरणात तीन किलोग्रॅम प्रदुषण करणारे घटक उत्सर्जित होतात, तसेच जमिनीतील आवश्यक पोषक तत्त्वेही नष्ट होतात. २०२५ मध्ये पंजाब आणि हरियाणामध्ये पराली जाळण्याच्या घटनांमध्ये ५३% घट झाली असली, तरी लहान आणि सूक्ष्म शेतकऱ्यांना यंत्रसामग्री उपलब्ध करून घेणे आणि पिकांच्या अवशेषांचे व्यवस्थापन करणे, विशेषतः दोन हंगामांमधील अगदी थोड्या काळात, अजूनही आव्हानात्मक ठरत आहे.

### नेत्राडाइन आणि एनएचईव्ही यांची भागीदारी; वाहन उपक्रमाला बळकटी



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित फ्लीट सुरक्षा आणि परफॉर्मन्स तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक अग्रणी कंपनी नेत्राडाइन ने भारताच्या नॅशनल हायवेज फॉर इलेक्ट्रिक व्हेईकल्स (एनएचईव्ही) उपक्रमात विकसित होत असलेल्या इलेक्ट्रॉनिक हायवे नेटवर्कसाठी इंटेलिजन्स आणि सुरक्षा प्रणाली उपलब्ध करून देणार असल्याची आज घोषणा केली. या उपक्रमाअंतर्गत एनएचईव्हीच्या एकात्मिक ई-हायवे पायाभूत सुविधांमध्ये अत्याधुनिक 'इंटेलिजन्स लेयर' जोडला जाईल, ज्यामुळे लांब पल्ल्याच्या इलेक्ट्रिक वाहतुकीला अधिक सुरक्षित, परस्पर जोडलेली आणि विश्वासार्ह बनविण्यास मदत होईल. या उपक्रमांतर्गत नेत्राडाइनची एआय-सक्षम सोल्युशन्स प्रणाली एनएचईव्ही समर्थित कॉरिडॉरवर धावणाऱ्या व्यावसायिक इलेक्ट्रिक वाहनांमध्ये टप्प्याटप्प्याने बसविण्यात येईल. यामुळे रिअल-टाइम फ्लीट निरीक्षण, संभाव्य जोखमींची पूर्वसूचना, चालकांच्या वर्तनाचे विश्लेषण आणि कार्यप्रणालीचे परीक्षण यांसारख्या सुविधा उपलब्ध होतील. हे सहकार्य मागील राबविण्यात आलेल्या पायलट प्रकल्पांच्या अनुभवांवर आधारित असून, तंत्रज्ञान-सक्षम महामार्ग परिसंस्था उभारण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

### मीशोने बीएसईसोबत केली भागीदारी



पुणे (आरंभ पर्व) : वार्षिक व्यवहार करणारे ग्राहक आणि ऑर्डर्सच्या संख्येच्या बाबतीत भारतातील सर्वात मोठे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म असलेल्या 'मीशो'ने बीएसईच्या भागीदारीत 'प्रोजेक्ट शिखर' सुरू करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत, एमएसएमई ना बीएसईच्या एसएमई प्लॅटफॉर्मवर सार्वजनिकरीत्या सूचीबद्ध होण्यासाठी मदत केली जाईल; ज्यामुळे त्यांना त्यांच्या विकासासाठी आवश्यक भांडवल उभारणे शक्य होईल. ही भागीदारी सामंजस्य करार (एमओयू) मीशोच्या कॉर्पोरेट व्यवहार प्रमुख, श्रीमती लोपामुद्रा राव आणि बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुंदररामन राममूर्ती यांच्या उपस्थितीत स्वाक्षरित करण्यात आला. डिजिटल व्यवसायांना संस्थात्मक भांडवल उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

# पुणे शहर वरिष्ठ उपाध्यक्षपदी रुपेश घुले यांची निवड



> निवडीनंतर बोलताना रुपेश घुले पाटील म्हणाले की, "पक्षाने माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल मी पक्षश्रेष्ठींचा ऋणी आहे. पुणे शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी तसेच नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे."
>
> **- रुपेश घुले पाटील, शहर उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पुणे**

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

नांदेड गावचे माजी उपसरपंच, खडकवासला विधानसभा मतदारसंघातील मातब्बर नेते तथा सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते रुपेश घुले पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पुणे शहर वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे खडकवासला विधानसभा मतदारसंघासह नांदेड परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवाजीनगर येथील पक्ष कार्यालयात आयोजित कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत त्यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीत आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने केलेल्या कामाची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीपूर्वी त्यांनी भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षामध्ये त्यांनी प्रवेश केला होता. त्यांच्या पत्नी सौ. रश्मी घुले यांनी प्रभाग क्रमांक 33 मधून निवडणूक लढवली होती. त्यात त्यांना अपयश आले मात्र तरीही घुले दांपत्य कार्यरत राहिले. त्यामुळेच पक्षाने त्यांना मोठी ताकद दिली आहे..

श्री.रुपेश घुले पाटील हे नांदेड गावातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासकामांमध्ये सक्रिय राहिले आहेत. गावाच्या विकासासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यामुळे त्यांची पक्षातील प्रतिमा एक अभ्यासू आणि कार्यक्षम नेतृत्व म्हणून निर्माण झाली आहे.

यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष विजय कोलते, शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता इंगळे, त्रिंबक मोकाशी, संदीपदादा मते, हेमंद्रजी जोशी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या निवडीबद्दल खडकवासला परिसरातील कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक वाढीसाठी आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

## ऐतिहासिक दर्गा महापालिका प्रशासनाकडून उध्वस्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



जुन्या पुणे मुंबई महामार्गावर असलेला बोपोडी येथील ऐतिहासिक हजरत शमसुद्दीन दर्गा महापालिका प्रशासनाने कोणतेही संयुक्तिक कारण न देता, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता आणि आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता न करता मनमानी पद्धतीने कारवाई करून उध्वस्त केला आहे, असा आरोप उपमहापौर व स्थानिक नगरसेवक परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला. याप्रकरणी सर्वसाधारण सभेत प्रशासनाला जाब विचारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. बोपोडी येथे संबंधित दर्गा तब्बल दीडशे वर्षांपासून उभा आहे. त्याला राज्य शासनाचा अ वर्ग प्राप्त आहे. मेट्रो अथवा रस्ता रुंदीकरणात या दर्ग्याची कोणतीही अडचण नाही. या दर्ग्याबाबत कोणत्याही स्थानिक नागरिकाने अथवा लोकप्रतिनिधी तक्रार केलेली नाही. हा दर्गा या परिसरातील हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतिक होता. तरीही महापालिका प्रशासनाने लोकप्रतिनिधींची दिशाभूल करून या दर्ग्यावर अन्यायकारक कारवाई केल्याचे वाडेकर यांनी सांगितले. शिवशंकर स्वामी नामक एका व्यक्तीने हा दर्गा हटवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केल्याची माहिती मिळाल्याचे वाडेकर यांनी सांगितले. दर्ग्याच्या ट्रस्टला पूर्वकल्पना न देता, नोटीस न बजावता, उपमहापौर व स्थानिक नगरसेवक म्हणून आपल्याला व अन्य स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता रात्रीच्या अंधारात करण्यात आलेली ही कारवाई सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याची मान खाली घालायला लावणारी आहे.

## सायकलींच्या चाकांमधून फिरला माणुसकीचा संदेश !

### डिवाईन जैन ग्रुप ट्रस्टचा जागतिक सायकल दिनानिमित्त स्तुत्य उपक्रम

- पुणे शिवाजीनगर कोर्टात अनोखा उपक्रम
- गरजू मुलींना सायकलींचे वाटप




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजसेवा ही केवळ मदत नसून ती माणुसकीची खरी ओळख असते. महाराष्ट्रभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि मानवतावादी उपक्रमांद्वारे गरजूंना आधार देणाऱ्या डिवाईन जैन ग्रुप ट्रस्टने पुन्हा एकदा आपल्या संवेदनशील कार्याची प्रचिती दिली आहे. 'प्रदूषण टाळा, जग वाचवा, भविष्य वाचवा' हा महत्त्वपूर्ण संदेश देत जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधून पुणे येथे एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. डिवाईन जैन ग्रुप ट्रस्ट आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजीनगर कोर्टातील अशोका हॉल येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष ए. टी. वानखेडे यांच्या हस्ते व मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. याप्रसंगी जिल्हा न्यायाधीश-१ आणि सत्र न्यायाधीश एस. एस. कंठाळे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नेटके संयोजन डिवाईन जैन ग्रुप ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष संकेत शहा यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शाश्वत भविष्यासाठी पेट्रोल-डिझेल वाहनांचा वापर कमी करण्याचे जे आवाहन केले आहे, त्याच विचाराने प्रेरित होऊन हा उपक्रम घेण्यात आला. याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नुकतीच १०वी उत्तीर्ण झालेल्या गरजू मुलींना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छांसह सायकली भेट देण्यात आल्या. अनेक मुलींसाठी ही सायकल केवळ वाहन नव्हती, तर त्यांच्या शिक्षणाच्या आणि स्वप्नांच्या प्रवासाला मिळालेली नवी दिशा होती. तसेच, संपूर्ण भारतभर ११,००० पेक्षा जास्त किलोमीटरचा सायकल प्रवास करणारे प्रसिद्ध सायकलपटू उत्तम धोका यांचा याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्यातून युवकांना प्रेरणा मिळावी, हा उद्देश यामागे होता. याप्रसंगी डिवाईन जैन ग्रुप ट्रस्टचे सर्व सदस्य, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे पदाधिकारी, वकील वर्ग व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्यदायी आणि हरित भविष्यासाठी सायकल चालवण्याचा संकल्प करत या कार्यक्रमाचा समारोप झाला.

## आकाशच्या विद्यार्थ्यांची जेईई ॲडव्हान्स्डमध्ये चमकदार कामगिरी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

परीक्षा तयारी सेवांमधील राष्ट्रीय स्तरावरील अग्रणी असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने (एईएसएल) जेईई ॲडव्हान्स्ड 2026 परीक्षेत पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्तरावर, आकाशच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय रँकच्या (एआर) टॉप १०० मध्ये अनेक रँक मिळवले आहेत, ज्यात एआर ४, एआर १७, एआर ३५, एआर ४१, एआर 42, एआर 52, एआर 59, एआर 63, एआर 86 आणि एआर 94 यांचा समावेश आहे. या कामगिरीने शैक्षणिक उत्कृष्टता आणि सातत्यपूर्ण निकालांप्रति संस्थेची वचनबद्धता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या यशात भर घालत, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी परीक्षेत प्रभावी कामगिरी केली आहे, अनेक उल्लेखनीय रँक मिळवले आहेत आणि भारतातील सर्वात स्पर्धात्मक अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या या परीक्षेत राज्याचे मजबूत अस्तित्व दाखवून दिले आहे. महाराष्ट्रातील आकाश केंद्रांमधील एकूण ५९ विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्स्ड 2026 मध्ये यश मिळवले आहे, जे त्यांचे कठोर परिश्रम, चिकाटी आणि शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेली वचनबद्धता दर्शवते. हे यश एईएसएल च्या संरचित शिक्षण प्रणाली, अनुभवी शिक्षक आणि परीक्षेच्या तयारीसाठी असलेल्या विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाची परिणामकारकता देखील अधोरेखित करते.

महाराष्ट्रातील यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये पुणे-PCMC येथील दीक्षांत शर्मा आघाडीवर आहे, ज्याने प्रभावी एआर ६३ मिळवून, राज्यातील आकाशचा सर्वोच्च रँक मिळवणारा विद्यार्थी म्हणून स्थान मिळवले आहे.

## आरएसपीएल समूहाने भारताच्या विकासकथेत योगदान देत ५० वर्षांचा प्रवास केला साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या वेगाने विक्री होणाऱ्या ग्राहक वस्तू उत्पादक समूहांपैकी एक असलेल्या आरएसपीएल समूहाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण केली असून, कानपूरपासून भारत आणि जागतिक स्तरावरील वाढत्या उपस्थितीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास अधोरेखित केला आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये कंपनीने "भारतामध्ये निर्मित, भारतासाठी" या दृष्टिकोनाला चालना देत देशभरातील २४ हून अधिक उत्पादन प्रकल्पांद्वारे देशांतर्गत उत्पादन क्षमतांना बळकट केले आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याचे स्मरण करण्यासाठी, आरएसपीएल समूहाने एक लघुपट सादर केला आहे, जो कंपनीचा प्रवास, मूल्ये आणि विकसित होत जाणारी दृष्टी जिवंत करतो. प्रसिद्ध अभिनेते आणि चित्रपट निर्माते रजत कपूर यांच्या निवेदनातून साकारलेला हा चित्रपट भारतासोबत विकसित झालेल्या ब्रँडची भावना प्रतिबिंबित करतो.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या खडकवासला अध्यक्षपदी अतुल धावडे यांची निवड

## युवकांच्या प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेणार



> "राष्ट्रवादी युवक काँग्रेसने माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत खडकवासला मतदारसंघातील युवकांना संघटित करण्यासाठी आणि पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करणार आहे. अवैध दारू विक्री, जुगार अड्डे, वाढती गुन्हेगारी तसेच युवकांच्या विविध प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून आक्रमकपणे आवाज उठवू. जनतेचे प्रश्न रस्त्यावर उतरून मांडण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस सदैव सज्ज राहील."
>
> **- अतुल धावडे, अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) पुणे शहरच्या वतीने अतुल बबनराव धावडे यांची खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या युवक अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच खासदार सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीपत्र सुप्रिया सुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, पुणे महानगरपालिका गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनितताई इंगळे, ग्रामीणचे अध्यक्ष त्र्यंबक (अण्णा) मोकाशी यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

अतुल धावडे यांनी यापूर्वी कोंढवे धावडे गावचे माजी उपसरपंच तसेच संजय गांधी निराधार समितीचे सदस्य म्हणून काम केले आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि युवकांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने कार्य केले असून परिसरातील नागरिकांशी त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीचे कार्यकर्ते आणि नागरिकांकडून स्वागत करण्यात आले आहे. नियुक्तीप्रसंगी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी धावडे यांच्यावर विश्वास व्यक्त करत युवक संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाची विचारधारा युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावीपणे काम करण्याच्या शुभेच्छा दिल्या.

नियुक्तीनंतर बोलताना अतुल धावडे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानत खडकवासला मतदारसंघातील युवकांना संघटित करण्यासाठी आणि पक्ष अधिक बळकट करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. खडकवासला मतदारसंघात वाढत असलेली जुगार अड्डे, वाढती गुन्हेगारी तसेच युवकांच्या विविध समस्या या प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून जोरदार आवाज उठवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या नियुक्तीमुळे खडकवासला मतदारसंघातील राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महामंडळ आणि सदस्यांच्या हितासाठी अपक्ष संघ सरसावला

पुणे (आरंभ पर्व) : अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या आगामी निवडणुकीत समोरासमोर दिसणारी दोन प्रमुख पॅनल प्रत्यक्षात एकाच विचारधारेची असून त्यांच्यातील संघर्ष हा केवळ दिखावा असल्याचा गंभीर आरोप अपक्ष उमेदवार शरद लोणकर यांनी केला आहे. गेल्या दहा वर्षांत महामंडळाच्या कारभारात असलेल्या संचालकांनी चित्रपटसृष्टीच्या प्रश्नांवर ठोस काम करण्याऐवजी अंतर्गत वाद आणि राजकारणातच वेळ घालवल्याचा आरोप त्यांनी केला. प्रस्थापितांची मुजोरी मोडीत काढून महामंडळ आणि सदस्यांच्या हितासाठी आठ अपक्ष उमेदवारांनी एकत्र येऊन संघ उभा केल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या पत्रकार परिषदेला दिग्दर्शक अमोल भावे, निर्माता महादेव शिरोळकर, मानसिंग कदम, कला दिग्दर्शक उल्हास लांडगे या उमेदवारांसह अपक्ष संघाला पाठिंबा देणाऱ्या अभिनेत्री, निर्मात्या भाग्यश्री देसाई या उपस्थित होत्या. अभिनेत्री स्मिता गोंदकर आणि शाहीर संभाजी भगत यांच्यासह अनेकांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा दावा अपक्ष संघाच्या वतीने करण्यात आला.

### वसुंधरा संवर्धन रथाचे उद्घाटन; वृक्षरोपांचे वाटप करण्याचा संकल्प



पुणे (आरंभ पर्व) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्था, जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन पुणे (GPA) तसेच पुणे सिंहगड रोड डॉक्टर्स असोसिएशन (PSRDA) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'वसुंधरा संवर्धन रथ' या विशेष उपक्रमाचे उद्घाटन खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर आणि पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्या हस्ते करण्यात आले. सिंहगड रोड परिसरातील गृहनिर्माण सोसायट्या, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांपर्यंत देशी प्रजातींची वृक्षरोपे पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत ५००० देशी वृक्षरोपांचे मोफत वाटप करण्याचा संकल्प करण्यात आल्याची माहिती उपक्रमाचे प्रमुख आयोजक आणि संस्थापक अध्यक्ष नगरसेवक हरिदास चरवड यांनी दिली. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रवाढ आणि जैवविविधतेचे जतन या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या अभियानाद्वारे विविध सोसायट्या व सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन वृक्षरोपांचे वितरण करण्यात येणार आहे. वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. यावेळी GPA चे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब काकडे, PSRDA च्या अध्यक्षा डॉ. राजश्री काकडे, ज्येष्ठ माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, जयश्री भूमकर, संदीप बेलदरे, युवराज बेलदरे, सारंग नवले, विशाल उभे, उपआयुक्त विजयकुमार वाघमोडे, आरोग्य निरीक्षक संदीप खराडे, कुणाल मते, मुकादम अशोक साठे यांच्यासह विविध सामाजिक व पर्यावरणप्रेमी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### इंधनाची उपलब्धता स्थिर; इंधन वितरणावर कोणतेही निर्बंध नाहीत

पुणे (आरंभ पर्व) : इंडियनऑइल आपल्या विस्तृत पुरवठा आणि वितरण नेटवर्कद्वारे देशभरात पेट्रोल (एमएस),डिझेल (एचएसडी) आणि द्रवीकृत पेट्रोलियम वायू (एलपीजी) यांचा पुरेसा आणि अखंडित पुरवठा कायम ठेवत आहे.सर्व रिटेल विक्री केंद्रांवर इंधन वितरणाची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू असून पुरवठा कोणत्याही निर्बंधांशिवाय कायम ठेवला जात आहे. रिटेल विक्री केंद्रांचे संचालन हे पीईएसओ परवाने आणि जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या ना हरकत प्रमाणपत्रांनुसार (एनओसी) केले जाते.

# खडकवासला ग्रामीण अध्यक्षपदी ॲड. सुधाकर गायकवाड यांची निवड

पुणे (दै. आरंभ पर्व)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाने संघटनात्मक बांधणीला गती देत विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण अध्यक्षपदी युवा व तडफदार नेते ॲडव्होकेट सुधाकर गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवाजीनगर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सुधाकर गायकवाड यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष विजय कोलते, पुणे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, पुणे महापालिकेचे गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता इंगळे, संदीप मते, रुपेश घुले पाटील यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नियुक्तीनंतर बोलताना ॲड. सुधाकर गायकवाड यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. आगामी विधानसभा निवडणुकीत खडकवासला मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचा आमदार निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांच्या बळावर जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. ॲड.सुधाकर गायकवाड हे खानापूर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विद्यमान ग्रामपंचायत सदस्य असून सामाजिक आणि विकासकामांमधील त्यांच्या सक्रिय सहभागामुळे त्यांची परिसरात स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या पत्नी प्राध्यापिका शिल्पा गायकवाड सध्या खानापूरच्या सरपंच म्हणून कार्यरत आहेत.

खडकवासला व खानापूर परिसरातील विविध लोकाभिमुख उपक्रमांमुळे ॲड. सुधाकर गायकवाड यांच्या कार्याची नागरिकांमध्ये चांगली चर्चा असून त्यांच्या नियुक्तीमुळे पक्ष संघटनेला नवसंजीवनी मिळेल, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

> "पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे. खडकवासला मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक बळकट करून आगामी निवडणुकीत पक्षाचा आमदार निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांसोबत खांद्याला खांदा लावून काम करेन."
>
> **- ॲड. सुधाकर गायकवाड, ग्रामीण अध्यक्ष, खडकवासला विधानसभा मतदारसंघ.**

## सोन्याचे दागिने चोरट्यांनी लांबवले

राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

सोन्या-चांदीच्या दागिन्यांना पॉलीश करण्याचा बहाणा करून दोन अज्ञात भामट्यांनी महिलेचे एक लाख रुपयांचे दागिने लांबविल्याची घटना रेटवडी (ता. खेड ) येथे घडली. याप्रकरणी नीता सुनील पवळे (वय ४७, रा. रेटवडी, पवळेवस्ती, ता. खेड ) यांनी खेड पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरोधात फिर्याद दिली आहे. ही घटना बुधवारी (दि.३) सकाळी घडली. या घटनेबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महिला घराबाहेर अंगणात भांडी घासत होत्या. यावेळी दोन भामट्यांनी येऊन तुमची भांडी घासून स्वच्छ करून देतो, असे सांगून घरातील दोन तांब्याची भांडी व पायातील पैंजण तेथेच पॉलिश करून दिले. यामुळे फिर्यादी महिलेचा त्यांच्यावर विश्वास बसला.

नंतर, तुमच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने सुद्धा असेच पॉलिश करून देतो. असे सांगुन महिलेच्या गळ्यातील ८० हजार रुपयांचे सोन्याचे मिनी गंठण, २० हजार रुपये किंमतीची कानातील सोन्याची कर्णफुले घेऊन तेथून पळ काढत मोटारसायकलवर बसून पळून गेले.

## सेवानिवृत्ती एक अविस्मरणीय क्षण; सेवापूर्ती सन्मान सोहळा संपन्न

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएमएल) मधील ज्येष्ठ कर्मचारी भाऊसाहेब काकडे व आकाश सावंत यांची जवळपास 30 ते 32 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर कंट्रोलर-कम-चेकर पदावरून सन्मानपूर्वक सेवानिवृत्ती झाली. यानिमित्त स्वारगेट बस स्थानक येथे त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.



दोन्ही अधिकाऱ्यांनी आपल्या सेवेला चालक पदापासून सुरुवात केली होती. प्रवासी जनतेची निष्ठेने सेवा करत त्यांनी अधिकारी पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या या यशस्वी कारकिर्दीबद्दल सहकाऱ्यांनी गौरवोद्गार काढले.

वाहतूक नियंत्रक तथा स्थानक प्रमुख संतोष आडेप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात भाऊसाहेब काकडे व आकाश सावंत यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी वाहक तानाजी कांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना निवृत्तीनंतरचे आयुष्य आनंदाने, समाधानाने व आरोग्याची काळजी घेत जगण्याचा सल्ला दिला. तसेच अर्बन बँकेचे संचालक बाबुल नेटके यांनीही दोन्ही निवृत्त कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष शिंदे यांनी केले. विशाल काळे, सुनील वावरे आणि सचिन जगताप यांनी संयोजन केले.

यावेळी ट्रॅफिक इन्स्पेक्टर दिवे साहेब, कंट्रोलर मुजावर तसेच मोठ्या संख्येने चालक, वाहक व कर्मचारी उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यातील अवैध हातभट्टी दारू व्यवसायाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची नागेश चव्हाण यांची मागणी

सोलापूर (दै. आरंभ पर्व)

राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी सोलापूर जिल्ह्यात सुरू असल्याच्या तक्रारी असलेल्या अवैध हातभट्टी दारू निर्मिती, अवैध मद्यसाठा, वाहतूक, विक्री तसेच विषारी मद्यनिर्मिती प्रकरणांची उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी राज्य शासनाकडे केली आहे.



मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री, मुख्य सचिव, राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त तसेच सोलापूरचे नवनियुक्त जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन आणि पोलीस प्रशासन तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनात त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील विविध भागांमध्ये अवैध मद्यव्यवसायाबाबत सातत्याने तक्रारी होत असल्याचे नमूद केले आहे.

अवैध मद्यव्यवसाय हा केवळ महसूल बुडविण्याचा विषय नसून तो जनतेच्या आरोग्य, जीवित, कायदा व सुव्यवस्था तसेच युवकांच्या भवितव्याशी संबंधित गंभीर प्रश्न असल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे. नुकत्याच पुण्यामध्ये झालेल्या विषारी दारू प्रकरणांमध्ये 18 जणांचा मृत्यू झाला. राज्यातील विविध भागांत घडलेल्या विषारी दारू प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात अशा

### सोलापूर जिल्ह्यात खबरदारीची गरज

घटना टाळण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निवेदनात जिल्ह्यातील अवैध हातभट्टी दारू निर्मितीची वास्तविक स्थिती, कच्च्या मालाचा पुरवठा, वाहतूक मार्ग, वितरण साखळी, कारवाईतील तफावत, संवेदनशील भागांची स्थिती, विभागांतील समन्वय, संभाव्य भ्रष्टाचार किंवा संगनमत तसेच जप्त मद्याचे वैज्ञानिक विश्लेषण यांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच जिल्हाभर विशेष संयुक्त मोहीम राबविणे, स्वतंत्र विशेष तपास पथक (SIT) नेमणे, मागील पाच वर्षांतील अवैध दारू प्रकरणांचे लेखापरीक्षण करणे, विषारी मद्य नमुन्यांची तपासणी करणे, तक्रारदार व सामाजिक कार्यकर्त्यांना संरक्षण देणे आणि दोषींवर कठोर कारवाई करणे यासह विविध मागण्या त्यांनी शासनाकडे केल्या आहेत.

भविष्यात अवैध मद्यामुळे जीवितहानी अथवा सामूहिक विषबाधेची घटना घडल्यास संबंधित जबाबदार अधिकारी व घटकांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी नागेश चव्हाण यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडे केली आहे.

सोलापूर जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती व विक्रीसारख्या गंभीर प्रकारांवर कठोर कारवाई करून नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षाही जिल्हाधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेमध्ये नागेश चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

## उर्वरित प्रश्न सोडविण्यावर भर देणार : अनिकेत तटकरे

चिपळूण (दै. आरंभ पर्व)

कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्यानंतर आमदार अनिकेत तटकरे यांनी चिपळूण येथे पत्रकारांशी संवाद साधताना महाविकास आघाडीचे उमेदवार बाळ माने यांच्या भूमिकेचे स्वागत करत त्यांचे मनापासून आभार मानले. कोकणच्या विकासाशी संबंधित उर्वरित प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्राधान्याने काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. अनिकेत तटकरे म्हणाले की, या निवडणुकीत महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच ही बिनविरोध निवड शक्य झाली. यासाठी त्यांनी महायुतीच्या सर्व नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे तसेच मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचे आभार



व्यक्त केले. महाविकास आघाडीचे उमेदवार बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा घेतलेला निर्णय हा लोकशाही प्रक्रियेत महत्त्वाचा असल्याचे सांगत तटकरे यांनी त्यांच्या भूमिकेचे स्वागत केले. "बाळ माने यांनी घेतलेल्या निर्णयामुळे निवडणूक बिनविरोध झाली.

त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो," असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी राजकीय घडामोडींवर भाष्य करताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी "सुनील तटकरेंकडे भानामती आहे" असे वक्तव्य करून त्यांच्या राजकीय करिष्म्याला अप्रत्यक्षपणे मान्यता दिल्याची टिप्पणी केली.

# जुन्नर मध्ये बनावट विदेशी मद्य रॅकेट उघडकीस

- ४.५० लाखांचा मुद्देमाल हस्तगत
- राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई



जुन्नर (दै. आरंभ पर्व)

जुन्नर परिसरात बनावट विदेशी मद्याची वाहतूक आणि साठा करणाऱ्या एका रॅकेटचा राज्य उत्पादन शुल्क विभागाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका मुख्य आरोपी व त्याला रिकाम्या बाटल्या पुरवणाऱ्या भंगार विक्रेत्यालाही देखील अटक करण्यात आली आहे.

उत्पादन शुल्क विभागाच्या नारायणगाव पथकाने या कारवाईत बनावट दारू, रिकाम्या बाटल्या, बुचे आणि एक वॅगनआर कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी गोविंद शंकर जाधव (रा. निरगुडे, ता. जुन्नर, ) असे अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेंद्र देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त सागर धोमकर आणि अधीक्षक अतुल कानडे यांच्या आदेशानुसार, ३० मे रोजी नारायणगाव विभागाचे पथक अवैध मद्य विरोधी गस्त घालत होते. यावेळी जुन्नर-गणेशखिंड रोडने एका कारमधून बनावट दारूची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार, अधिकाऱ्यांनी गणेशखिंड रोडवर सापळा रचला. जुन्नरकडून येणारी संशयास्पद वॅगनआर कार (क्र. MH 01 AX 2884) थांबवून पंचांसमक्ष तिची झडती घेतली असता, त्यात चंदीगड राज्य निर्मितीचे लेबल असलेला बनावट विदेशी मद्याचा साठा आढळला. आरोपी गोविंद जाधव याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने शिरोली खुर्द येथील त्याच्या तळाची माहिती दिली. उत्पादन शुल्क विभागाने तात्काळ शिरोली खुर्द येथे छापा टाकला. या छाप्यात बनावट दारू तयार करण्याचे साहित्य आणि मोठा साठा जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल

इम्पिरियल ब्लू व्हिस्की: १८० मिलीच्या ६० सीलबंद बनावट बाटल्या (बनावट बुचे व लेबलसह).
रॉयल स्टॅग व्हिस्की: १८० मिलीच्या १७३ सीलबंद बनावट बाटल्या.
युके नं. १ व्हिस्की (चंदीगड राज्य निर्मित): ७५० मिलीच्या ९६ सीलबंद बनावट बाटल्या.
मोठ्या प्रमाणावर बनावट बुचे, लेबल्स आणि रिकाम्या बाटल्या.
एक वॅगनआर कार आणि वनप्लस कंपनीचा मोबाईल.

पुण्याचे अधीक्षक आणि शिरूर विभागाच्या उप-अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नारायणगावचे निरीक्षक शरद जाधव, दुय्यम निरीक्षक सौरभ आवटे, समृद्धी निकम, सहाय्यक दुय्यम निरीक्षक दयानंद माने तसेच जवान निलेश केदार, दिलीप केकरे, प्रियांका झांज आणि गणेश वाव्हळ यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. यापुढील तपास दुय्यम निरीक्षक सौरभ आवटे करत आहेत.

# नवले पुलाजवळील सेवा रस्ता रुंदीकरण कामाचे उद्घाटन; कोंडी कमी होणार

पुणे (दै. आरंभ पर्व)

नवले पुलाजवळील सेवा रस्ता रुंदीकरण कामाचे उद्घाटन खडकवासला मतदारसंघाचे आ.भीमराव तापकीर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कामामुळे परिसरातील वाढती वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार असून नागरिकांना सुरक्षित, जलद आणि सुलभ प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

नवले पूल परिसरात वाढत्या वाहतुकीमुळे निर्माण होणारी कोंडी लक्षात घेऊन हाती घेण्यात आलेले हे रुंदीकरणाचे काम परिसराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जात आहे. भविष्यातील वाहतूक व्यवस्थेला देखील या कामाचा मोठा फायदा होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय अध्यक्ष सचिन मोरे, नगरसेवक हरिदास चरवड,



नगरसेविका ज्योती गोसावी, नगरसेविका जयश्री भुमकर, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, प्रभाग अध्यक्ष राजू कुटे,सचिन मनेरे, शहाजी वांजळे तसेच इतर मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या विकासकामाचे स्वागत करत परिसरातील पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी करत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. यावेळी आमदार भीमराव तापकीर यांनी सांगितले की, "नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अधिक सुविधा निर्माण व्हाव्यात, वाहतूक कोंडी कमी व्हावी आणि परिसराचा सर्वांगीण विकास साधला जावा यासाठी अशा विकासकामांना गती देण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहणार आहे." या कामामुळे नवले पूल परिसरातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जागतिक मासिक पाळी दिनानिमित्त जनजागृती सत्र

राजगुरूनगर(आरंभ पर्व) : जागतिक मासिक पाळी दिनानिमित्त युवा मित्र संस्था, टाटा ऑटोकॉम्प आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कनेरसर (ता. खेड) येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कनेरसर येथे सहा महिन्यांपासून महिलांसाठी मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येत असून, या अंतर्गत महिलां व किशोरवयीन मुलींसाठी विविध जनजागृती सत्रे आयोजित करण्यात आली होती. जागतिक मासिक पाळी दिनानिमित्त महिलांच्या व किशोरवयीन मुलींच्या आरोग्याचा विचार करून पर्यावरणपूरक कॉटन कपड्यांपासून तयार करण्यात आलेल्या कपड्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामध्ये गावातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमादरम्यान गावातील आरोग्य सेविका व आशा वर्कर मीरा पवळे आणि युवा मित्र संस्थेच्या विजया डांगे यांनी महिलांना मासिक पाळी स्वच्छता, आरोग्याची काळजी व गैरसमज याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी महिलांच्या मनोरंजनासाठी व जनजागृतीसाठी विविध खेळ व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांच्या विविध प्रश्नांचे समाधान करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याबद्दल ग्रामस्थांनी युवा मित्र संस्था, टाटा ऑटोकॉम आणि टाटा ट्रस्ट यांचे आभार मानले.

### ह्युंदाई इनोव्हेशन चॅलेंजची घोषणा





पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) तर्फे ह्युंदाई इनोव्हेशन चॅलेंज 2026 ची घोषणा करण्यात आली असून या उपक्रमात सहभागी होण्यासाठी स्टार्टअप्सकडून अर्ज मागवले आहेत.हे इनोव्हेशन चॅलेंज सहा महिन्याचा उपक्रम आहे. याचा उद्देश इलेक्ट्रिफिकेशन, नवीन गतीशीलता,कनेक्टिव्हिटी,एडीएएस प्रणाली,एआय आधारित साधने आणि पुढच्या पिढीतील वाहन तंत्रज्ञान या क्षेत्रात अत्याधुनिक उपाययोजना विकसित करणाऱ्या स्टार्टअप्सबरोबर भागीदारी करणे हे आहे.ग्लोबल स्टार्टअप कन्सल्टींग आणि ॲक्सिलरेटर प्लॅटफॉर्म असलेल्या लिंक इनोव्हेशन तर्फे व्यवस्थापित संकेतस्थळाच्या माध्यमातून स्टार्टअप्स जून 2026 अखेरपर्यंत आपले अर्ज पाठवू शकतात.



### हिरो मोटोकॉर्पकडून पहिल्या फ्लेक्स फ्यूएल मोटरसायकल्सचे अनावरण

पुणे (आरंभ पर्व) : शाश्वत नाविन्यतांना चालना देत हिरो मोटोकॉर्प या जगातील मोटरसायकल आणि स्कूटर्सच्या सर्वात मोठ्या उत्पादक कंपनीने आज आपल्या पहिल्या फ्लेक्स फ्यूएल वेईकल्स- आयकॉनिक स्प्लेंडर+ आणि एचएफ डिलक्स लॉंच केल्या आहेत. या लॉंचसह, भारताने १०० सीसी सेगमेंटमध्ये आपल्या पहिल्या फ्लेक्स फ्यूएल मोटरसायकल्सचे स्वागत केले आहे, जो देशाच्या अधिक स्वच्छ, स्वावलंबी आणि भविष्य-सज्ज गतिशीलतेच्या दिशेने वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. दैनंदिन प्रवासासाठी डिझाइन केलेली ही नाविन्यपूर्ण मोटरसायकल श्रेणी ई२० ते ई८५ पर्यंतच्या इथेनॉल-मिश्रित इंधनांशी पूर्णपणे सुसंगत आहे. ही नवीन लाइनअप ग्राहकांना त्यांच्या विश्वासार्ह कार्यक्षमता किंवा परवडणाऱ्या किमतीशी कोणतीही तडजोड न करता अत्यंत व्यावहारिक आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देते. दैनंदिन प्रवासातील कार्बनचे प्रमाण आणि पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम लक्षणीयरित्या कमी करून या मोटरसायकल्स २०३० पर्यंत इकॉनॉमिक कार्बन तीव्रता ४५ टक्क्यांनी कमी करण्याच्या भारताच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला पाठबळ देतात.



### महात्मा गांधी विद्यालयाच्या प्राचार्यापदी सौ. संगिता शिर्के यांची नियुक्ती

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : उरुळी कांचन येथील महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित महात्मा गांधी विद्यालयाच्या प्राचार्यपदी सौ.संगिता शिर्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच उपप्राचार्यपदी दादासाहेब यादव, इयत्ता दहावी विभाग प्रमुखपदी पर्यवेक्षक पृथ्वीराज कड, तर पर्यवेक्षकपदी सत्यवान जगताप व अविनाश कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. माजी प्राचार्य भारत भोसले व उपप्राचार्य विलास काशिद हे सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झालेल्या पदांवर या नियुक्त्या करण्यात आल्या. संस्थेचे खजिनदार व विश्वस्त राजाराम कांचन यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत संस्थेच्या शैक्षणिक परंपरेला अधिक समृद्ध करण्याचा विश्वास व्यक्त केला. विशेष म्हणजे, महात्मा गांधी विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी ते प्राचार्या असा प्रेरणादायी प्रवास सौ. संगिता शिर्के यांनी पूर्ण केला आहे. १९९३ साली शिक्षिका म्हणून रुजू झालेल्या सौ. शिर्के यांना तब्बल ३३ वर्षांचा प्रदीर्घ शैक्षणिक व प्रशासकीय अनुभव आहे. शिक्षक, विभागप्रमुख आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत त्यांनी विद्यार्थीकेंद्री शिक्षण, शिस्त, गुणवत्ता वाढ आणि संस्कारमूल्ये जपण्यावर सातत्याने भर दिला आहे. उरुळी कांचन पंचक्रोशीतील या नामांकित शैक्षणिक संकुलाशी त्यांच्या कुटुंबाचा दोन पिढ्यांचा ऋणानुबंध राहिला आहे. जिल्हा विभाग राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू त्यांनी घडविले आहेत. हजारो विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या या संस्थेच्या प्राचार्यपदी त्यांची निवड झाल्याने शिक्षक, माजी विद्यार्थी व पालक वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# १०० पेक्षा जास्त देशी वृक्षांचे वृक्षारोपण





> कार्यक्रमाचे आयोजन केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्था यांच्या पुढाकारातून करण्यात आले असून परिसरातील पर्यावरण संवर्धनासाठी संस्थेच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि घटते हरित क्षेत्र लक्षात घेता वृक्षारोपण ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे, असा संदेश जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण अभियानातून देण्यात आला. केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्था, संस्थापक अध्यक्ष नगरसेवक हरिदास चरवड, जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन पुणे (GPA) आणि पुणे सिंहगड रोड डॉक्टर्स असोसिएशन (PSRDA) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामीनारायण मंदिराजवळील नऱ्हे टेकडी येथील स्वर्गीय उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यानामध्ये भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या अभियानांतर्गत १०० पेक्षा जास्त देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यामध्ये कडुलिंब, चिंच, जांभूळ, वड, पिंपळ, निलगिरी तसेच इतर पर्यावरणपूरक वृक्षांच्या रोपांचा समावेश होता. कार्यक्रमाचे उद्घाटन खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. भीमराव (अण्णा) तापकीर तसेच पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष मा. श्रीनाथजी भिमाले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्रीनाथजी भिमाले यांनी सांगितले की, पुणे शहरामध्ये पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र वन विभाग यांच्या संयुक्त प्रकल्पांच्या धर्तीवर नऱ्हे सर्व्हे क्र. १७ (ता. हवेली, जि. पुणे) येथील सुमारे ५२.५३ हेक्टर क्षेत्रावर महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या जागेचा संयुक्त प्रकल्पामध्ये समावेश करून "स्वर्गीय उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान, नऱ्हे" विकसित करण्यात यावे, असा ठराव नगरसेवक हरिदास चरवड यांनी स्थायी समितीपुढे सादर केला होता. सदर ठराव स्थायी समितीने मंजूर केला असून त्याबाबतची आवश्यक कार्यवाही लवकरच करण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या प्रकल्पामुळे नऱ्हे परिसरात मोठ्या प्रमाणावर जैवविविधतेचे संवर्धन होऊन नागरिकांना पर्यावरणपूरक हरित क्षेत्र उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन पुणे (GPA) चे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब काकडे, पुणे सिंहगड रोड डॉक्टर्स असोसिएशन (PSRDA) च्या अध्यक्षा डॉ. राजश्री काकडे, ज्येष्ठ माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, नगरसेविका जयश्रीताई भूमकर, नगरसेवक संदीपजी बेलदरे, नगरसेवक युवराज बेलदरे, सारंग नवले, खडकवासला युवा मोर्चा अध्यक्ष विशालजी उभे, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे उपआयुक्त विजयकुमार वाघमोडे, आरोग्य निरीक्षक संदीप खराडे, आरोग्य निरीक्षक कुणाल मते, मुकादम अशोक साठे यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. तसेच लाईफ ट्री, सुप्रभात योगा समूह, सिंहगड ट्रेकर्स, झाडे लावा झाडे जगवा अभियान, खंडवा ट्रेकर्स, ग्रीन हिल्स आणि इतर विविध पर्यावरणप्रेमी संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपण ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, निरोगी आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संवर्धन व संगोपन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

## जेडब्ल्यू मॅरिएटच्या ब्रँड ॲम्बेसेडर पदी ऐश्वर्या राय बच्चन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मॅरियट बॉनव्हॉयच्या ३० हून अधिक जागतिक ब्रँड्सच्या पोर्टफोलिओचा एक भाग असलेल्या जेडब्ल्यू मॅरिएटने आज ऐश्वर्या राय बच्चन यांच्यासोबत जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून केलेल्या सहयोगाची घोषणा केली आहे. या सहकार्याद्वारे ऐश्वर्या राय बच्चन ब्रँडच्या जागतिक "स्टे इन द मोमेन्ट " या संकल्पनेला अधिक प्रभावी आणि नव्या स्वरूपात सादर करतील. विचारशील आणि जागतिक स्तरावरील दृष्टिकोनामुळे या संकल्पनेची प्रमुख आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील या ब्रँडचे महत्त्व आणि प्रभाव अधिक दृढ होण्यास मदत होईल.ही नियुक्ती ब्रँडच्या सातत्यपूर्ण वाटचालीसोबतच उत्क्रांतीचेही प्रतीक आहे. स्टे इन द मोमेन्ट ही संकल्पना आजही जेडब्ल्यू मॅरिएटच्या ब्रँड तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे.जे. विलार्ड मॅरियट यांच्या वारशावर आधारित ही संकल्पना सर्वांगीण कल्याणावर भर देते.

## दौंड पोलीसांची सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई

### दोन आरोपी एक वर्षासाठी तडीपार




**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड पोलीस स्टेशन हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी दौंड पोलिसांकडून सराईत गुन्हेगारांविरुद्ध प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. सराईत आरोपी अमोल शंकर विटकर (रा. बोरावकेनगर, ता. दौंड, जि. पुणे) याच्याविरुद्ध शरीराविरुद्धचे गुन्हे, लोकांमध्ये भीती व दहशत निर्माण करणे, दमदाटी करून जीवे मारण्याच्या धमक्या देणे तसेच मानवी जीवितास धोका निर्माण करणारे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्याविरुद्ध दौंड पोलीस स्टेशन येथे सन २०२३ ते २०२५ या कालावधीत विविध गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. तसेच असीम कासिम उर्फ असिफ कासम कुरेशी (रा. खाटीक गल्ली, दौंड, जि. पुणे) याच्याविरुद्ध शरीराविरुद्धचे गुन्हे, गोवंश जातीच्या जनावरांची बेकायदेशीर कत्तल, गोवंश जनावरे कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवणे, तसेच नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावण्यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्याविरुद्धही दौंड पोलीस स्टेशन येथे अनेक गंभीर गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

सदर दोन्ही आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) (अ) व (ब) अन्वये दोन्ही आरोपींविरुद्ध तडीपार कारवाईचा प्रस्ताव मा. उपविभागीय दंडाधिकारी, दौंड यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सुनावणी होऊन मा. उपविभागीय दंडाधिकारी श्री. रेवनाथ लबडे यांनी आरोपी १) अमोल शंकर विटकर व २) असीम कासिम उर्फ असिफ कासम कुरेशी यांना पुणे पोलीस आयुक्तालय व महानगरपालिका हद्दीसह पुणे, सोलापूर, सातारा व अहिल्यानगर जिल्ह्यांच्या हद्दीतून पुढील एक वर्ष कालावधीसाठी तडीपार करण्याचा आदेश पारित केला आहे. सदर तडीपार आदेशाची दोन्ही आरोपींना विधिवत बजावणी करण्यात आली असून त्यांना संबंधित जिल्ह्यांच्या हद्दीबाहेर रवाना करण्याची कार्यवाही देखील पूर्ण करण्यात आली आहे. दौंड पोलीसांकडून गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अशा प्रकारच्या प्रतिबंधात्मक कारवाया यापुढेही प्रभावीपणे सुरू राहणार आहेत.

## स्वामी चिंचोलीच्या लेकीची भरारी

- स्वामी चिंचोलीच्या गरीब शेतकऱ्याच्या लेकीची मुंबई सुरक्षा दलात निवड; गावात आनंदोत्सव




> फीजाच्या निवडीमुळे गावातील मुलींमध्ये नवचैतन्य संचारले असून,अनेकजणींनी आता स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली आहे. "खाकी वर्दी घालून आई-वडिलांचे आणि गावाचे नाव मोठं करायचंय," असे फीजा निर्धाराने सांगते.

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

स्वामी चिंचोली, ता. दौंड जिद्द आणि कष्टाच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते हे स्वामी चिंचोली येथील गरीब कुटुंबातील कन्या कु.फीजा मेहबूब मुजावर हिने दाखवून दिले आहे. फीजाची नुकतीच *मुंबई सुरक्षा दलामध्ये* निवड झाली असून, तिच्या यशाने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण झाले आहे.

फीजाचे वडील अल्पभूधारक शेतकरी असून,आई मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवते. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असतानाही फीजाने शिक्षणाची कास सोडली नाही. शिक्षण घेत असतानाच तिने पोलिस भरतीची तयारी सुरू केली. पहाटे 4 वाजता उठून शेतात जाण्यापूर्वी धावण्याचा सराव, नंतर दिवसभर कॉलेज आणि रात्री अभ्यास,अशी तिची दिनचर्या होती.

"घरात खायचे वांधे होते,पण बाबांनी कधीच 'शिकू नको' म्हटले नाही. उलट 'तूच आमची स्वप्नं पूर्ण कर' असा धीर दिला," असे भावूक होऊन फीजा सांगते. भरतीसाठी आवश्यक असलेले बूट, ट्रॅकसूट घेण्यासाठीही पैसे नव्हते. तेव्हा वडिलांनी गाडी चालवून तिला साहित्य घेऊन दिले. मुंबई सुरक्षा दलाच्या लेखी आणि मैदानी परीक्षेत फीजाने घवघवीत यश मिळवले.नागपूर येथे नुकतेच प्रशिक्षण घेऊन गावामध्ये आल्याने तिचा व आई वडिलांचा गावच्या वतीने सरपंच सौ पुनम मदने यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. सरपंच सौ.पुनम मदने म्हणाल्या, "फीजा आमच्या गावची लेक आहे. तिच्या यशाने स्वामी चिंचोलीचे नाव संपूर्ण राज्यात पोहोचले.गरीब घरातील मुलींनी फीजाचा आदर्श घ्यावा. ग्रामपंचायतीतर्फे तिचा यथोचित सत्कार करण्यात आला."

## टाटा मोटर्सकडून ऑल-न्यू इंट्रा V40 लॉंच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनी Tata Motors ने ऑल-न्यू इंट्रा V40 पिकअप वाहन बाजारात दाखल केले आहे. सीएनजी + पेट्रोल बाय-फ्यूइल तंत्रज्ञानाने सज्ज असलेले हे वाहन लहान व्यावसायिक वाहने (SCV) आणि पिकअप विभागातील कंपनीचे पर्यायी इंधन क्षेत्रातील नेतृत्व अधिक मजबूत करणार आहे. अधिक भारवाहक क्षमता आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेसाठी डिझाइन करण्यात आलेल्या इंट्रा V40 मध्ये १,५२५ किलोची पेलोड क्षमता आणि २,९६० मिमी (९.७ फूट) लांबीची लोड बॉडी देण्यात आली आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या मालवाहतुकीसाठी हे वाहन उपयुक्त ठरणार असून वाहनधारकांना अधिक उत्पन्न मिळविण्यास मदत होणार आहे. १.२ लिटर इंजिन असलेल्या या वाहनातून ५८ बीएचपी शक्ती आणि १०६ एनएम टॉर्क मिळतो. ११० लिटर क्षमतेच्या सीएनजी टाकीमुळे लांब पल्ल्याच्या प्रवासातही उत्तम कामगिरी मिळते. बाय-फ्यूइल तंत्रज्ञानामुळे सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही इंधनांमध्ये सहज बदल करता येतो, त्यामुळे वाहनाचा वापर अधिक लवचिक आणि किफायतशीर ठरतो.

# वास्तूरचनाशास्त्रात १३ वर्षांमध्ये २५ पीएच. डी. धारकांचा रौप्यमहोत्सवी टप्पा पूर्ण !

## 'बीएनसीए' पीएच.डी संशोधन केंद्रातर्फे मार्गदर्शन व संशोधन दस्तावेजांचे प्रकाशन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमधील (बीएनसीए) पीएच.डी. (विद्यावाचस्पती) संशोधन केंद्रातर्फे गेल्या १३ वर्षांमध्ये वास्तूरचनाशास्त्रातील (आर्किटेक्चर) २५ संशोधकांना मार्गदर्शन करून त्यांना पीएच. डी. पदवी मिळवून देण्याचा रौप्यमहोत्सवी टप्पा पूर्ण केला आहे! वास्तूरचना क्षेत्रातील हा एक अभिमानास्पद उच्चांक असून या सर्व डॉक्टरेट पदवीधारकांच्या समावेत एका वैशिष्ट्यपूर्ण स्नेहमेळाव्यात त्यावर आधारित तयार करण्यात आलेल्या दस्तावेजाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. ५ जून २०२६ रोजी 'जागतिक पर्यावरण दिना'चे औचित्य साधून कर्वेनगर येथील महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण केंद्राच्या आवारातील आयएसडीएस सभागृहात सकाळी ११ वाजता हे सर्व पदवीधारक, त्यांचे मार्गदर्शक, शिक्षणतज्ज्ञ आणि अन्य संशोधक यांच्या उपस्थितीत विशेष स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत 'संशोधन संहितेच्या सारांशाच्या एकत्रित संग्रह' असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. 'बीएनसीए'मध्ये २०१२ मध्ये स्थापन झालेल्या पीएच. डी. संशोधन केंद्र हे वास्तूरचनाशास्त्र विषयातील पहिले आणि अग्रगण्य संशोधन केंद्र असून ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न काम करत आहे. बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेल्या या केंद्रामध्ये पीएच. डी. संशोधन व संशोधन मार्गदर्शनाचा पाया प्रा. डॉ. वसुधा गोखले आणि प्रा. डॉ. अभिजित नातू यांनी घातला आहे. या केंद्राच्या समन्वयक व संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. मीरा शिरोळकर ते काम करत आहेत. सध्या या केंद्रात सहा मान्यता पात्र संशोधक मार्गदर्शक कार्यरत असून वीस संशोधक त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. साठी संशोधन करत आहेत.

'विशेष म्हणजे आजवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वास्तूरचनाशास्त्र विषयातील एकंदर ३० डॉक्टरेट पदव्यांपैकी २५ पदव्या ह्या एकट्या बीएनसीएतील पीएच.डी. संशोधन केंद्रातील मार्गदर्शनातून पूर्ण करण्यात आल्या आहेत, ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे', असे बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांनी सांगितले. ते म्हणाले की, या निमित्त तयार करण्यात येणारा २५ डॉक्टरेट मिळालेल्यांच्या शोधनिबंधांचा सारांश पुस्तकरूपात प्रसिद्ध होणार आहे. तो वास्तूरचना क्षेत्रातील अकादमिक क्षेत्रासाठी व व्यावसायिकांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल. डॉ. वसुधा गोखले म्हणाल्या की, या सोहळ्याद्वारे बीएनसीए पीएच. डी. संशोधन केंद्रातील डॉक्टरेट पदवीधारकांचा गौरव, संशोधन मार्गदर्शकांचा सन्मान आणि वास्तूरचनाशास्त्रातील संशोधन संस्कृती अधिक बळकट करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

डॉ. मीरा शिरोळकर म्हणाल्या की, २५ शोधनिबंधाच्या या पुस्तकात बीएनसीए संशोधन केंद्रातून पूर्ण झालेल्या पीएच.डी. संशोधनाच्या सारांशाचा समावेश असून ते केंद्राने आजवर केलेल्या योगदानाचे ते दस्तावेजीकरण ठरेल. यातील प्रत्येकाचा शोधनिबंध हा 'शोधगंगा' या मायाजालावर उपलब्ध आहे.

दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

## आपल्या जाहिरातींसाठी
## विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

**आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये – विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.**

### आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

### का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी




**आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी**

## आजच संपर्क साधा!

**संपर्क :** प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल : aparvinfo@gmail.com

**दैनिक आरंभ पर्व** | “आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र”